# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेची पाणीपट्टी कर आकारणी विक्रमी पातळीवर**
- **पाणीपुरवठा व मल:निसारण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे तसेच जनजागृती उपक्रमाचे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी केले विशेष कौतुक**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने पाणीपट्टी कर वसुली करण्यात विक्रमी कामगिरी केली असून, दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी मध्यरात्रीपर्यंत एकूण ₹१०७.७७ कोटींची कर आकारणी करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा तब्बल ₹२४.११ कोटी जास्त कर गोळा करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये कराचे महत्व पटवून देण्याच्या सातत्यपूर्ण जनजागृती मोहिमा आणि मनपा अधिकाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ही यशस्वी कर वसुली साध्य झाली आहे. या पाणीपट्टी कर गोळा करण्याच्या प्रक्रियेत कर विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी केली, यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी अधिकारी आणि कर्मचारी यांचा सत्कार केला.

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत प्रती वर्षी पाणीपट्टी वसुलीकरीता विषेश मोहिम राबविण्यात येते. सन २०२४- २०२५ यावर्षात देखिल मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली सदर मोहिमेअंतर्गत विभागातील शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, लिपिक, मेस्त्री व मिटर रिडर यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर पथक थकबाकीदारकांची यादी तयार करुन प्रत्यक्ष थकबाकीधारकांना भेटी देणे, थकबाकीधारकांना नोटीस बजावणे, थकीत रकमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करणे, चेक रिर्टन वसुली करणे व थकबाकीधारकांच्या नळजोडण्या खंडीत करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात आली.

नागरीकांमध्ये पाणीपट्टी भरणा जलद होणेसाठी जनजागृती करणेकरीता ऑटोरिक्षा यांच्यावर ध्वनिक्षेपकाव्दारे जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात आल्या. तसेच प्रत्यक्ष पाणीपट्टी थकबाकीधारकांच्या घरोघरी भेट देऊन थकीत पाणीपट्टी रकमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत नागरीकांना पाणीपट्टी भरणे सोयीचे होणेकरीता महानगरपालिकापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच मोबाईलव्दारे देखिल MyMBMC या मोबाईल अॅपद्वारे तसेच POS मशीनव्दारे पाणीपट्टी भरण्याची सुविधा देण्यात आली. तसेच, सर्व सार्वजनिक सुट्टी, शनिवार तसेच रविवार या दिवशी सर्व पाणीपट्टी भरणा केंद्र सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात आलेली होती. पाणी पुरवठा विभागातील सर्व कर्मचारी वर्ग यांनी सर्व सुट्टीच्या दिवशी देखिल पाणीपट्टी वसुलीकरीता प्रयत्न केले. पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने ३१ मार्च २०२५ अखेर एकूण ₹१०७.७७ कोटी अर्थात ९८. ५५% पाणीपट्टी वसुली करण्यात आलेली आहे. पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नामुळे ही विक्रमी वसुली करता आली. याकरीता विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या कामगिरी करीता मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.